| | |
|---|---|
| | दि.कि.अ.क्र. १२/२०२६<br>नाजेमाबानो व ई. वि. कुणीही नाही<br>एम.एच.वाय.ए.क्र.१३–०००१२१–२०२६ |

# निशाणी क्र. ०१ वर आदेश

[दिनांक ०७/०४/२०२६ रोजी पारित]

प्रस्तुत अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेगुलेशन (VIII) १८२७ मधील कलम (I) अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केला आहे.

२. **अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे कि:**

अर्जदार क्र. १ नामे– नाजेमाबानो सैय्यद मोबीन ही मयत सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांची पत्नी असून, अर्जदार क्र. २ ते ४ हे त्यांचे मुले व मुली आहेत. मयत सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांचा मृत्यु दिनांक २५.०८.२०१७ रोजी मेडिकेअर हॉस्पीटल, पुसद येथे झाला. अर्जदार क्र.१ ही पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ हे मुले व मुली या नात्याने मृतक सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांचे वारस असून, त्यांच्या मृत्यू पश्चात शासकीय व इतर निमशासकीय कामाकरिता अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची मागणी होत असल्यामुळे, शेवटचा पर्याय म्हणून अर्जदारांनी ते मृतकाचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्ज दाखल झाल्यानंतर चौकशीचा भाग म्हणून जाहीरनामा प्रसिद्ध करण्याचा आदेश निशाणी क्र.१ वर पारित करण्यात आला. त्यानुसार अर्जदारांनी निशाणी क्र. १७ अन्वये दिनांक १९/०२/२०२६ रोजी दैनिक हिंदुस्थान या वर्तमानपत्रामध्ये जाहीरनामा प्रसिद्ध केला. परंतु त्याला प्रतिसाद म्हणून कुणीही हजर होऊन उजर घेतली नाही.

४.            अर्जाचे स्वरूप आणि अर्जदारांनी अभिलेखावर आणलेला पुरावा पाहता निर्णयासाठी उपस्थित मुद्दे व त्यावरील माझा निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार क्र. १ ते ४ हे मृतक सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांचे कायदेशीर वारस आहे, असा दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **होकारार्थी.** |
| **२.** | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## **– का र ण मी मां सा –**

५.            अर्जदारांनी त्यांची मागणी सिद्ध करणेकरीता अर्जदार क्र. २ नामे– सय्यद मतिन यांनी नि.क्र. ०९ वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करून स्वतःला तपासले आहे. त्यानंतर अर्जदारांनी निशाणी क्र.१८ वर पुरसिस दाखल करून स्वतःचा पुरावा बंद केल्याचे घोषीत केले. अर्जदारांनी स्वतःच्या तोंडी पुराव्या व्यतिरिक्त काही कागदोपपत्री पुरावे अभिलेखावर दाखल करून सिद्ध केलेत. ते म्हणजेच:

१]   मृतक नामे– सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांचे मृत्युप्रमाणपत्र (नि.क्र. १०)
२]   मृतकाचे तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांचे पडताळलेले आधारकार्ड (अनुक्रमे नि.क्र. ११ ते १५)
३]   गृहचौकशी अहवाल (नि.क्र. १६)
४]   दैनिक हिंदुस्थान या वर्तमानपत्रात प्रकाशित झालेली जाहीर नोटीस (नि.क्र. १७)

६.            प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांनी कथन केलेली हकीकत तसेच अर्जदार क्र. १ यांच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता, असे निदर्शनास येते

की, अर्जदार क्र. २ यांनी त्यांच्या मृत वडिलांची ओळख नि.क्र. १० वरील मृत्यु प्रमाणपत्राच्या आधारे सिद्ध केली. त्यांनी त्यांच्या वडिलांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या आधारे त्यांचा मृत्यू दिनांक २५.०८.२०१७ रोजी मेडिकेअर हॉस्पीटल, पुसद येथे झाल्याचे सिद्ध केले. तसेच त्यांनी नि.क्र. ११ ते १५ वरील आधारकार्डच्या अनुषंगाने मृतकाची तसचे सर्व अर्जदारांची ओळख सिध्द केली. तसेच त्यांनी नि.क्र. १६ वरील गृहचौकशी अहवालाद्वारे मृतक सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांना अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या व्यतिरिक्त कुणीही वारस नसल्याचे सुध्दा सिध्द होते.

७. अर्जदारांनी उपरोक्त दस्त ऐवजांच्या माध्यमातून अर्जदार हे मृतक सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांचे वारस आहेत हे सुद्धा सिद्ध केले. अर्जदारांनी जरी का ते वारस असल्याचे संबंधित दस्तैवजांच्या आधारे सिद्ध केले असले तरी सुध्दा दैनिक हिंदुस्थान नि.क्र. १७ वरील जाहिर नोटीसच्या अनुषंगाने कोणीही वर्तमानपत्रात दिलेल्या जाहीर नोटीसला एक महिन्याचा कालावधी उलटून सुद्धा सदरच्या कालावधीत कुठलाही आक्षेप कुणाच्याही तर्फे आलेला नाही. नियमानुसार जाहीरनामा दैनंदिन वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित करून देखील, अर्जदारांच्या अर्जाला व पुराव्याला कुणीही हजर होऊन उजर घेतला नसल्यामुळे, अर्जदारांचे अर्जातील कथनास दस्तऐवजांच्या आधारे दुजोरा मिळालेला आहे. त्यामुळे अर्जदारांनी अर्जातील कथन माझ्यामते सिध्द केलेले आहे. अशा परिस्थितीत अर्जदारांचे अर्जातील कथन, तसेच अर्जदारांचा तोंडी व कागदोपत्री पुरावा नाकारण्याचे काहीच कारण दिसून येत नाही.

८. त्यामुळे अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ चे वडील, या नात्याने त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार क्र.१ ते ४ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करता मी या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहे की, अर्जदार हे सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांची पत्नी, मुले व मुली म्हणून त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारस आहेत व त्याप्रमाणे ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. परिणामी मी **मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा क्र.२** करिता खालील आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार नामे– नाजेमाबानो सैय्यद मोबीन, सैय्यद मतिन सैय्यद मोबीन, सैय्यद हसिन सैय्यद मोबीन व सैय्यद यासिन सैय्यद मोबीन हे मृतक नामे– सैय्यद मोबीन सैय्यद मुस्तफा यांचे अनुक्रमे पत्नी, मुले व मुली या नात्याने, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र नियमानुसार आवश्यक ती न्यायालयीन कोर्ट फी भरल्यानंतर निर्गमित करण्यात यावे.

३. अर्जदारांनी दिवाणी नियम पुस्तिका चे प्रकरण १४ प्रमाणे पूर्तता करावी.

**[आदेश खुल्या न्यायालय कक्षात पारित करण्यात आला]**

SAKHARE MANISHA BALAJI

Digitally signed by SAKHARE MANISHA BALAJI
Date: 2026.04.07 15:48:57 +0530

ठिकाणःदिग्रस.

दिनांक : ०७/०४/२०२६

**[एम.बी.साखरे]**
सह.दिवाणी न्यायधीश कनिष्ठ स्तर,
दिग्रस.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word for word as per original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (L.G.) | :- | S.B.Chilkewar |
| Name of the P.O. | :- | M. B. Sakhare |
| Designation | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Digras. |
| Date | :- | 07.04.2026 |
| Judgment signed by P.O. on | :- | 07.04.2026 |
| Judgment uploaded on | :- | 07.04.2026 |